• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक २८५ • रविवार,दि.१४ जानेवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 285 • Sunday 14 Janewari 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# दुष्काळामुळे परभणी जिल्ह्यात चार दिवसांआड शेतकऱ्याची आत्महत्या

परभणी । वृत्तसंस्था


**दुष्काळाच्या कचाट्यातून मात्र परभणी मुक्त होत नसल्याने या भागाचे वाळवंट होण्याची वेळ आली आहे. राजकीय, वैचारिक मतभेद बाजूला ठेवून जिल्ह्यातील नेतेमंडळी व जनतेने पुन्हा एकदा एकत्र येऊन दुष्काळाविरुद्ध लढा देण्याची गरज निर्माण झाली आहे. मात्र, तसे होताना दिसत नाही. परिणामी, जगाचा पोशिंदा म्हणून समजल्या जाणारा बळीराजा चार दिवसांआड आपले जीवन संपवत असल्याची विदारक स्थिती जिल्ह्यात आहे. मात्र, ही स्थिती बदलण्यासाठी शासन, प्रशासनस्तरावर आवश्यक ते बदल होत नसल्याचे दिसून येत आहे.**



सुजलाम् सुफलाम् असलेल्या या जिल्ह्यातून गोदावरी, दुधना, करपरा, पूर्णा या नद्या वाहतात. या नद्या जिल्ह्याच्या जीवनवाहिनी आहेत. त्या अप्रवाहित झाल्याने जिल्हा दुष्काळाच्या खाईत सापडला आहे. या नद्यांमधील वाळूचा बेसुमार उपसा केला जातो. त्याला आर्थिक हितसंबंधातून प्रतिबंध घातला जात नाही. ज्या नद्यांच्या पाण्यावर शेतकऱ्यांची शेती आहे. ते शेतकरीही बघ्याची भूमिका घेतात. शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून शेखी मिळविणारे नेते या वाळूमाफियांचे संरक्षक बनतात. परिणामी, या नद्यांमध्ये थेंबभरही पाणी जमा होत नाही. त्यामुळे निसर्गाने दिले; परंतु मानवानेच हातचे सोडून दिले, असे म्हणण्याची वेळ आली आहे. दुसरीकडे पडणाऱ्या पावसाचे पाणी आडवून ठेवण्यात व जमिनीत मुरवण्यात जिल्ह्याला अपयश आले. याशिवाय माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाणवगळता जिल्ह्यात अन्य राजकीय नेतेमंडळींना वाहून जाणारे पाणी थांबविण्याच्या दृष्टिकोनातून फारसा प्रयत्न करता आला नाही. त्यातच शासन, प्रशासनाकडून योजनांची जंत्री शेतकऱ्यांसाठी राबविली जाते. मात्र, त्याचा कोणताही उपयोग शेतकऱ्यांसाठी होताना दिसून येत नाही. परिणामी, शेतकऱ्यांना स्वतःच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होईल एवढीदेखील कमाई काही दिवसांपासून होत नसल्याचे दिसून येत आहे. परिणामी, वर्षभरात ९९ शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले आहे. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी शासन व प्रशासनाने ठोस उपाययोजना राबविणे गरजेचे आहे.

पाच वर्षांत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या आश्वासनाला नऊ वर्षे पूर्ण झाली. शेतकऱ्यांचे उत्पन्न या काळात दुप्पट झाले की नाही हा मंथनाचा विषय आहे, तरी दुसरीकडे मात्र जगाचा पोशिंदा म्हणून समजला जाणारा बळीराजा चार दिवसांआड आपले जीवन संपवत असल्याचे विदारक स्थिती जिल्ह्यात दिसून येत आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२३ या वर्षभराच्या काळात ९९ शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविल्याचे जिल्हा प्रशासनाच्या आकडेवारीवरून दिसून येत आहे. यामध्ये सर्वाधिक जुलै महिन्यात १४ जणांनी, तर ऑक्टोबर महिन्यात १३ जणांनी गळफास व विष प्राशन करून आत्महत्या केली आहे. परभणी जिल्ह्यातील जमीन ही सुपीक आणि काळी कसदार असली तरी मागील काही वर्षांपासून नैसर्गिक आपत्तीने शेतकऱ्यांच्या आर्थिक चक्र बदलून टाकले आहे. नगदी पीक म्हणून शेतकरी सोयाबीन, कापूस आदी पिकांची मोठ्या प्रमाणात लागवड करतो; परंतु ही पिके काढणीला आलीच की अतिवृष्टी, सततचा पाऊस, वादळ वाऱ्याने शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास हिरावून घेतो. दुसरीकडे यंदा तर ३२ टक्के पावसाची तूट निर्माण झाल्याने भीषण स्थिती जिल्ह्यात निर्माण झाली आहे. दुसरीकडे १२ हजार रुपये क्विंटल सोयाबीन तर १० हजार रुपये क्विंटल कापसाचे भाव असताना सध्या हे शेतीमालाचे भाव कापूस ७ हजार रुपये, तर सोयाबीन ४५०० रुपये क्विंटलवर येऊन ठेपले आहे. त्यामुळे नैसर्गिक संकटे आणि घसरते शेतमालाचे भाव शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरत असल्याचे सध्या तरी दिसून येत आहे. जिल्ह्यात दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली असताना शासन प्रशासनाकडून केवळ योजनांची जंत्री राबविली जात आहे. त्याचा कोणताही थेट फायदा शेतकऱ्यांना होत नाही. परिणामी, गतवर्षी जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत जिल्ह्यातील ७७ शेतकऱ्यांनी आपले जीवन संपले होते. याचा अर्थ दर पाच दिवसाला एका शेतकरी मृत्यूला कवटाळत होता; परंतु यंदा गतवर्षीपेक्षा ही भीषण परिस्थिती जिल्ह्यात उद्भवली आहे. सरासरीपेक्षा ३२ टक्के पाऊस कमी झाल्याने सध्या जिल्ह्यात दुष्काळी स्थिती आहे, अशा असताना शेतकऱ्यांना थेट फायदा पोहोचेल अशी कोणतीही मदत राज्य शासनाकडून करण्यात आलेली नाही. त्यामुळे जानेवारी ते डिसेंबर २०२३ या वर्षात ९९ शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले आहे. याचा अर्थ चार दिवसाला एक शेतकरी गळफास घेत असल्याचे जिल्हा प्रशासनाने दिलेल्या आकडेवारीवरून दिसून येत आहे.

## निवडणुकीसाठी महाराष्ट्र आणि उद्योगासाठी गुजरात लागतो -ठाकरे



मुंबई । वृत्तसंस्था

निवडणुका लागल्यानंतर आता भाजपाचे सगळेच नेते गोड बोलू लागले आहेत. पंतप्रधान देखील आता प्रचंड गोड बोलत असून त्यांना निवडणुकीसाठी महाराष्ट्र लागतो आणि व्यवसायासाठी गुजरात लागतो अशी टीका उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधानांवर केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी कल्याण लोकसभा मतदारसंघाचा दौरा अंबरनाथ पासून सुरू केला. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्र्यांवर कडाडून टीका केली. किमान पंतप्रधानांनी घराणेशाहीवर काहीही बोलू नये. ते आमच्या घरावर बोलत असतील तर आम्ही देखील त्यांच्या घरावर बोलू असे म्हणत पंतप्रधानांना टार्गेट केले. गद्दारांची घराणेशाही संपवल्याशिवाय खरा शिवसैनिक गप्प बसणार नाही. जे जे देशभक्त आहेत ते सगळे माझ्यासोबत आहेत असे म्हणत यावेळी उपस्थित असलेले काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय आणि वंचितच्या कार्यकर्त्यांना एकसंघ राहण्याच आवाहन केले. राम मंदिर आणि राम मंदिराची पूजा ही राष्ट्रीय अस्मितेचा विषय असून त्यासाठी राष्ट्रपतींना हातून पूजा करणे गरजेचे होते. मात्र राम मंदिराच्या आड निवडणुकीचा प्रचार काही लोक करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. कल्याण लोकसभा मतदारसंघ हा निष्ठावंत शिवसैनिकांचा बालेकिल्ला असून तो बालेकिल्ला शाबूत ठेवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर असल्याचे भावनिक आवाहन उद्धव ठाकरे यांनी केले. या मतदारसंघात असलेली गद्दारांची घराणेशाही संपवली गेलीच पाहिजे असे मत ठाकरे यांनी व्यक्त केले. महापालिका आणि नगरपालिकाच्या निवडणुका घेण्यासाठी देखील सरकार घाबरत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी खासदार संजय राऊत, खासदार राजन विचारे, राजेश वानखेडे, अजित काळे, संदीप पगारे, जाणू मानकर, गायकवाड यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## मराठा कुणबी एकच -जरांगे पाटील




सातारा । वृत्तसंस्था

मराठा आंदोलनाच्या मुद्यावरून मराठा कुणबीचा वाद पुढे आला आहे. मनोज जरांगे पाटलांनी मराठा समाज मुळात कुणबी असल्याचा दावा केला आहे. त्यांच्या या दाव्याची पुष्टी करणारा एक नवा पुरावा आता उजेडात आला आहे. त्यात कुणबी म्हणजेच मराठा अशी स्पष्ट नोंद आहे. सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील चिखलगोठण गावात कुणबी म्हणजेच मराठा अशी नोंद सापडली आहे. या नोंदीनुसार, 'जाई कोम रामा बुरलीकर इचा मुलगा आनंदा रामा चौगुला' यांच्या नावापुढे कुणबी म्हणजेच मराठा अशी नोंद आहे. ही नोंद १८८९ ची आहे. ती मूळ मोडी लिपीत असून, या लिपीचे अभ्यासक आशिष शिंदे यांनी ती प्रमाणित केली आहे. तासगावचे तहसीलदार रवींद्र रांजणे यांनी नोंद सापडल्याबाबत दुजोरा दिला आहे. आशिष शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, १८८९ च्या गावात २ नोंदी सापडल्या. त्यातील शेवटची नोंद कुणबी म्हणजे मराठा असून, त्यापुढील सर्व नोंदी मराठा अशाच आहेत. या गावात एकूण ८० नोंदी सापडल्या आहेत. लेखक व इतिहासकार डॉक्टर श्रीमंत कोकाटे यांनीही राज्यात कुणबी व मराठा वेगळे नसल्याचा दावा केला आहे. राज्यात कुणबी व मराठा वेगळे नाहीत. गत अनेक वर्षांपासून अभ्यासक हे सांगत आहेत. या पुराव्याने कुणबी म्हणजेच मराठे यावर शिक्कामोर्तब झाले. इतका अस्सल पुरावा आजवर सापडला नव्हता. बहुदा हा राज्यातील पहिलाच महसुली पुरावा असेल, असे ते म्हणाले. सांगलीच्या तासगाव तालुक्यात १८८९ च्या जन्म-मृत्यू रजिस्टरमध्ये कुणबी म्हणजे मराठा अशी नोंद सापडली आहे. तत्पूर्वी हैदराबाद स्टेटच्या १९०९ साली प्रकाशित झालेल्या गॅझेटनुसार, मराठवाड्यातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ३९ टक्के समाज कुणबी होता. विशेष म्हणजे १९२१ साली मुंबई उच्च न्यायालयाने मराठा व कुणबी एकच असल्याचा निवाडा दिला होता. त्यानंतर १९९७ साली औरंगाबाद जातपडताळणी समितीनेही मराठा व कुणबी एकच असल्याचे स्पष्ट केले होते.

## शेतकरी पक्षाचे रावसाहेब वाघ यांचे निधन

परभणी । वृत्तसंस्था

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा बाजार समितीचे माजी सभापती ज्येष्ठ विधिज्ञ रावसाहेब शंकरराव वाघ (वय ८२) यांचे दीर्घ आजाराने आज (दि.१३) निधन झाले. सेलू येथील एका खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. सायंकाळी सेलु येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ठरीरहशल थरसह शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून रावसाहेब वाघ यांनी जिल्ह्य़ातील शेतकरी, शेतमजूर, विविध समाज घटकांसाठी काम केले होते. १९८७ ते ९८ या कालावधीत त्यांनी बाजार समितीचे सभापती म्हणूनही काम पाहिले. तसेच १९७३ ते ७८ या दरम्यान परभणी जिल्हा परिषदचे ते सदस्य होते. तालुका देखरेख संघाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. ठरीरहशल थरसह सेलू तालुका संघर्ष समितीच्या माध्यमातून त्यांनी विविध प्रश्नांवर आवाज उठवला होता. तसेच सेलू तालुका निर्मितीत वाघ यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. १९९० साली शेकापच्या तिकीटावर त्यांनी पाथरी विधानसभेची निवडणूक लढवली होती. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. बाजार समितीचे सचिव राजीव वाघ यांचे वडील तर स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. शरद वाघ यांचे ते चुलते होत.






# घराण्यावर बोलू नका; ठाकरेंचा मोदींवर टिका




**मुंबई । वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घराणेशाहीवरुन केलेल्या टीकेला ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जोरदार पलटवार केला आहे. घरंदाज माणसाने घराणेशाहीवर बोलू नये अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे. तसेच राम मंदिरात स्व:ताची मूर्ती न लावता प्रभूश्रीरामाची मूर्ती लावा असा टोलाही उद्धव ठाकरेंनी लगावला आहे. उद्धव ठाकरेंनी कल्याण लोकसभा मतदार संघात दौरा केला. यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, हा मतदारसंघ सुरुवातीपासून शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. मात्र गद्दारांना गाडणारा हा मतदारसंघ आहे असे उद्धव ठाकरे म्हणाले. कल्याण लोकसभा बाप की जायदाद असे काहींना वाटतं असे म्हणत त्यांनी खासदार श्रीकांत शिंदेंवर टीका केली आहे. यावेळी बोलतांना उद्धव ठाकरे म्हणाले की, कल्याण लोकसभा मतदारसंघात गद्दारांची जी घराणेशाही आहे त्याबद्दल पंतप्रधान बोलले नाहीत. ती घराणेशाही चालते का?. तसेच उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावरही निशाणा साधला आहे. ''शिंदेंच्या घराण्याला उमेदवारी दिली ही माझी चूकच होती. माझी चूक मी सुधारणार आहे'', असे उद्धव ठाकरे म्हणाले. तसेच आमच्या घराण्यावर बोलू नका आम्हीही तुमच्या घाण्यावर बोलू असा इशाराही त्यांनी दिला. तसेच ''अटल सेतूचं उद्घाटन केले पण त्यामध्ये अटलजींचा फोटो कुठे होता? आता सुद्धा मला चिंता आहे की राम मंदिरात रामाची मूर्ती असेल की नाही. नाव अटल सेतू पण अटलजींची फोटोच नाही. त्यामुळे कृपा करा की त्या मंदिरात स्व:ताची नव्हे तर प्रभू श्रीरामाची मूर्ती लावा'', असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला आहे. राम मंदिराच्यावर बाबरी मशिद बांधली त्याप्रमाणे सोमनाथ मंदिराचा सुद्धा अनेकदा विद्धंस केला होता. तेव्हा सरदार वल्लभभाई यांनी पुढाकार घेतला. प्राणप्रतिष्ठेच्या वेळी सरदार वल्लभभाई पटेल नव्हते. सोमनाथ मंदिराच्या लोकार्पणासाठी देशाच्या राष्ट्रपतींनी आमंत्रिक केले होते आणि त्यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी सुद्धा देशाच्या प्राणप्रतिष्ठेचा प्रश्न आहे. त्यामुळे राष्ट्रपतींना आमंत्रित करावं. ते करतील की नाही माहिती नाही. आम्ही २२ तारखेच्या काळा राम मंदिरातील पूजेसाठी राष्ट्रपतींना आमंत्रित करत आहोत, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटलं.

## संपादकीय

## जिजाऊंना अभिवादन



जिजाऊंचा कालखंड ७५ पेक्षा जास्त वर्षांचा होता (१२ जानेवारी १५९८ ते १७ जून १६७४). म्हणजेच जिजाऊंचे चतुर्थ शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष पूर्ण झाले आहे. या वर्षानिमित्त सकल जनवादी चौकटीत त्यांच्या विचार व कार्याचा संक्षिप्त आढावा घेणे उचित ठरेल. जिजाऊंचे जीवन आणि कार्य समता, स्वातंत्र्य, न्याय, सहिष्णुता, सामाजिक सलोखा म्हणून आश्वासक होते. आदर्श होते. आजही त्यांचे विचार आणि कार्य दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहेत. सामाजिक - आर्थिक परिस्थितीचे योग्य आकलन, परिस्थितीप्रमाणे नेतृत्व करणे, परिस्थितीला आकार देणे, परोपकारी वृत्ती, व्यक्तीच्या कर्तृत्वावर विश्वास, दृढ निश्चय, राजकारण, मुत्सद्दीपणा, प्रशासकीय गुणवत्ता, प्रेरणाशक्ती, प्रेरणेच्या आधारित प्रत्यक्ष कृती घडवणे, विद्वत्ता अशा अनेक जिजाऊंकडील गुणांची नोंद महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, राजाराम शास्त्री भागवत अशा वेगवेगळ्या लेखकांनी केली आहे. जिजाऊंना त्यांच्या माहेरी समतेची शिकवण मिळाली होती (१५९८-१६०८). माहेर आणि सासर या दोन्ही घरांतून सामाजिक आणि स्त्री-पुरुष समतेचा वारसा मिळाला होता. कारण जिजाऊंचे वडील लखुजी जाधवराव यदूची परंपरा पाळणारे होते; तर आई म्हाळसाबाई आणि सासू उमाबाई यांचे माहेर परमार घराण्याची परंपरा पाळणारे होते. शहाजीराजे भोसले हे सूर्यवंशाची परंपरा पाळणारे. तीन घराण्यांनी वांशिक भेदभाव संकल्पनेवर मात केली होती. तसेच समतेचा पुरस्कार केला होता. जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांवर सकलजनवादी विचारांचे संस्कार केले. यातून सकलजनवादी स्वराज्य साकारले. जिजाऊंचे व्यक्तिमत्व वीरकन्या, वीरपत्नी, वीरमाता, राजमाता या पलीकडचा विचार स्वीकारणारे होते. जिजाऊंनी निश्चित जीवनमूल्यांचा स्वीकार केलेला होता. उदा. भारतीय स्त्री म्हणून स्त्री मुक्तीचा विचार आणि कार्यक्रम देतात. राजकारणाच्या क्षितिजावर मूल्यसंघर्षाचा एक आदर्श ठेवतात. जिजाऊ आधुनिक समाजाला आणि विचारवंतांना प्रेरणा देणार्या ठरल्या (महात्मा फुले, राजाराम शास्त्री भागवत, विठ्ठल रामजी शिंदे). त्यांनी स्वतःच्या सारासार विवेकबुद्धीनुसार समाजाला आकार दिला. त्यांचा विचार मानवकेंद्री होता. हा विचार निसर्ग, राज्य, कुटुंब, समाज, धर्म आणि मानव यांच्यामध्ये समतोल राखतो. माणूस हाच कर्ता आहे, हे तत्त्व जिजाऊंनी अधोरेखित केले होते. या तत्त्वाच्या चौकटीत त्या आपले जीवन जगल्या. स्वराज्य, स्वभूमी, स्वभाषा ही त्यांच्या जीवनातील त्रिसूत्री होती. स्वधर्म याचा अर्थ कर्तव्य. त्यांनी स्वधर्माबरोबरच स्वराज्याच्या कारभारातून मानवी हक्कांचा दावादेखील केला होता. यामुळे कर्तव्य आणि हक्क या दोन्हींचा संगम त्यांच्या जीवनामध्ये झालेला दिसतो. मानवाच्या अस्तित्वासाठी, कल्याणासाठी संघर्ष हा विचार जिजाऊंच्या जीवनचरित्रातून पुढे येतो. जिजाऊंच्या कालखंडामध्ये आध्यात्मिक आणि भौतिक यापैकी एक बाजू घेण्याची परंपरा प्रबळ होती. जिजाऊंनी मात्र या दोन घटकांचा योग्य समन्वय घातला. समाजाला दुष्काळात भौतिक मदत करण्याची गरज होती. तेव्हा त्यांनी पूर्णपणे भौतिक क्षेत्रावर लक्ष केंद्रित केले होते. थोरल्या दुष्काळाच्या काळात हे स्पष्टपणे दिसते. जिजाऊंनी परिस्थितीला नवा आकार देण्यासाठी कृषी क्षेत्रात बदल करण्याचा मार्ग स्वीकारला. त्यामुळे कृषीच्या क्षेत्रातील कर्तेपण हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खास वैशिष्ट्य होते. जिजाऊंच्या जीवनचरित्राचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्या योजक होत्या. अधिक आर्थिक परिस्थिती समजून घेऊन त्यांनी परिस्थितीला आकार दिला. जिजाऊंनी दैववादी व पितृसत्ताक चौकट नाकारली होती. त्या व्यक्तीला कार्यप्रवण करणार्या योजक होत्या. जिजाऊंनी मानवी चैतन्याचा शोध व्यक्तीमध्ये घेतला. त्यांनी व्यक्तीला निष्क्रियतेपासून दूर केले व सक्रिय बनविले. त्यांनी सहकार्याची प्रवृत्ती या गुणाचा विकास केला. ठेविले अनंते तैसेची राहावे तसेच आलिया भोगासी असावे सादर ही जिजाऊंची धारणा नव्हती. निजामशाहीच्या र्हासानंतर शहाजीराजे व जिजाऊंच्या जीवनात संकटांचे डोंगर उभे राहिले. तेव्हा दुष्काळ पडलेला होता आणि मानवी जीवन प्रचंड खडतर झाले होते. अशा संकटातही जिजाऊंनी न डगमगता जीवन प्रवास सुरू ठेवला. जिजाऊंनी न्याय, समता, अहिंसा, शांतता अशा मूल्यांचा आग्रह धरला होता. जिजाऊंनी जातीची अन्यायकारक सामाजिक उतरंड नाकारली. स्वराज्याच्या गुप्तहेर यंत्रणेत, लष्करात, स्वराज्यात जातीच्या उतरंडीला स्थान दिले नाही. याउलट भक्ती चळवळीकडून आलेली समतेची परंपरा स्वीकारली. न्याय निवाडे करतानाही जिजाऊंनी समता तत्त्व प्रस्थापित करण्यासाठी उच्च जातीचे विशेष अधिकार नाकारले. जिजाऊंनी दुर्बल आणि हतबल व्यक्तींना आर्थिक साधने उपलब्ध करून दिली. त्यांनी सामाजिक न्यायासाठी सकारात्मक कृतीचे धोरण राबविले. न्यायनिवाडा करताना सामाजिक न्याय म्हणून आर्थिक दुर्बलांची बाजू घेतली. जिजाऊंनी त्यांच्या काळात राजकारणात, समाजकारणात, प्रशासनात सहभाग घेतला. शिवराय आग्र्याला गेले तेव्हा जिजाऊंनी स्वराज्याचा कारभार चालविला होता. त्यांनी त्यांच्या जीवनात अनियंत्रित राजकीय सत्ता कधीही स्वीकारली नाही. जिजाऊंनी मानवी जीवनाला प्रगतीच्या मार्गावर आणले. त्यांनी गरजेनुसार अनेक बदलही घडवून आणले. जिजाऊंनी सामाजिक सलोखा, सखा-सखीची संकल्पना, लोक विवेकनिष्ठा अशा संकल्पना व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनामध्ये राबविल्या होत्या. या अर्थाने जिजाऊंची समग्र जीवनदृष्टी सकलजनवादी होती, असे सुस्पष्टपणे दिसते.

## तरुण शेतकऱ्याची शेतात गळफास घेऊन आत्महत्या

**परभणी । वृत्तसंस्था**

पिंपळखुटा येथील तरुण शेतकऱ्याने शनिवारी ता. १३ सकाळी शेतात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. सुरेश बोंद्राजी जाधव (३८) असे मयत शेतकऱ्याचे नाव असून त्याने नापिकीमुळे आत्महत्या केल्याची शक्यता गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे. याबाबत गावकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपळखुटा येथील सुरेश जाधव यांना गावालगत तीन ते साडेतीन एकर शेत आहे. या शेतात त्यांनी खरीप हंगामात सोयाबीन घेतले होते. मात्र सोयाबीनला उतारा कमी आल्याने लागवडीचा खर्चही निघाला नाही. या शिवाय रब्बी हंगामात हरभरा पिकाची पेरणी केली. मात्र अवकाळी पाऊसामुळे पहिल्यावेळी पिक जळून गेले तर दुबार पेरणी नंतरही हरभरा पिक आलेच नाही. त्यामुळे आता उदरनिर्वाह कसा करावा असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला होता. दरम्यान, आज सकाळी त्यांचा मुलगा ओमकार हा बाबा देवदर्शनाला जाऊ यात असे म्हणत होता. मात्र मुलाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करुन सुरेश शेतात गेले. त्यानंतर त्या ठिकाणी गफळास घेतला. बराच वेळ होऊनही ते घरी आले नसल्याने त्याच्या वडिलांनी शेतात जाऊन पाहिले असता सुरेश यांचा मृतदेह झाडाला गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच बासंबा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विलास चवळी, जमादार प्रविण राठोड यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. नापिकीमुळेत त्यांनी आत्महत्या केली असावी अशी शक्यता गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, मयत सुरेश यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हिंगोलीच्या शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, आई, वडिल अशा परिवार आहे.

## दडपशाही करून भाजपने पक्ष फोडला, घरेही फोडली



**जालना । वृत्तसंस्था**

शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पुन्हा एकदा भाजपवर (इगझ) जोरदार हल्लाबोल करत टीका केली आहे. दडपशाही करून भाजपाने पक्ष फोडला आणि घरे देखिली फोडली आहे. मात्र, महाराष्ट्राची ही संस्कृती नाही. अदृश्य शक्तीच्या बळावर संविधानाला बाजूला ठेवून निर्णय घेतले जात असून, हे दुर्दैवी असल्याचं सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत. तर, शिवसेना पक्ष बाळासाहेब ठाकरेंनी स्थापन केला होता. मात्र, काल लागलेल्या निकालाची ऑर्डर इंग्रजीत वाचली. ऑर्डर दुसऱ्याने लिहिली, यांना वाचायला दिली,अशी दबक्या आवाजात चर्चा असल्याचेही सुप्रिया सुळे म्हणाल्या. जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतांना त्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या. दरम्यान, आरक्षणाच्या मुद्यावर देखील सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मराठा, धनगर, लिंगायत समाजासह अन्य समाजाच्या आरक्षणाची मागणी सातत्याने केली जात आहे. आताच्या सत्ताधाऱ्यांनी सत्ता स्थापन करण्यापूर्वी छातीठोकपणे आरक्षण देण्याची भाषा केली होती. आज दहा वर्षे लोटली, कुणाला दिले आरक्षण? असा असा खोचक टोला सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव न घेता लगावला. राज्यात सर्वत्र कमी-अधिक प्रमाणात दुष्काळी परिस्थिती असून, पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत राज्यसरकारने सर्व कार्यक्रम बाजूला ठेवून पाणीप्रश्न सोडविण्याला प्राधान्य दिले पाहिजे. दुष्काळी परिस्थितीबाबत आपण अगोदरच केंद्र सरकारला पत्र पाठवले आहे. याशिवाय विकासाच्या प्रत्येक मुद्यावर आपण संसदेत नेहमीच आवाज उठवित आलो आहोत असेही सुप्रिया सुळे म्हणाल्यात. मराठवाड्याच्या दौऱ्यावर असलेल्या सुप्रिया सुळे यांनी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात देखील भेट दिली. तर, रुग्णालयात घुसून एका टोळक्याने निवासी डॉक्टरांना रॉडने मारहाण केल्याची घटना समोर आली होती आणि याच जखमी डॉक्टर महिलेची सुप्रिया सुळे यांनी भेट घेऊन विचारपूस केली. तसेच ही अतिशय गंभीर बाब आहे. रुग्णालयात सेवा देणारे डॉक्टर्स देखील सुरक्षित नसतील तर रुग्णसेवा सक्षम कशी राहिल?, मूळात या राज्याला पुर्णवेळ गृहमंत्री नाही. त्यामुळे हे प्रकार घडत असून, कायदा सुव्यवस्था ढासळली आहे.

## बनावट विदेशी स्कॉच बनवण्याच्या कारखान्याचा पर्दाफाश,मुद्देमाल जप्त

**पुणे । वृत्तसंस्था**

राज्य उत्पादन शुल्कच्या पुणे विभागाने बनावट विदेशी स्कॉच तयार करणाऱ्या कारखान्याचा पर्दाफाश करुन दहा लाखांचा मुद्देमाल जप्त केला. कात्रज परिसरातील देहू रोड बायपास, आंबेगाव बु. येथे बनावट विदेशी स्कॉच बनवण्याचा कारखाना सुरु होता. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या या कारवाईमुळे खळबळ उडाली आहे. या कारवाईत महेशभाई हरिभाई कोळी (रा. बालाजी हाईट्स, मंगळवार पेठ, पुणे) याला अटक करण्यात आली आहे. ही कारवाई शुक्रवारी (दि. १२) रात्री करण्यात आली. देहूरोड बायपास रोड स. नं. ३, आंबेगाव बुद्रुक येथे बनावट विदेशी स्कॉच बनवण्याचा कारखाना सुरु असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क, सी विभागाचे उपअधीक्षक संतोष जगदाळे यांना मिळाली. त्यानुसार पथकाने शुक्रवारी आंबेगाव बु. येथील कारखान्यावर दारुबंदी गुन्ह्यांतर्गत छापा टाकला. या ठिकाणावरुन बनावट विदेशी स्कॉचच्या ३४ सिलबंद बाटल्या, दोन दुचाकी वाहने, ५५१ रिकाम्या बाटल्या, बाटल्यांचे बुच, मोनोकार्टून, हिट गन (हेअर ड्रायर), इंडक्शन (शेगडी), प्लास्टिक पॅकिंग रोल, प्लास्टिक चिकटपट्टी आणि मोबाइल फोन असा एकूण १० लाख ३९ हजार ७४७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारखान्यात विदेशी बनावटीचे मद्य वापरण्यात आलेल्या रिकाम्या बाटल्यात पुन्हा मद्य भरून त्याची विक्री केली जात होती. हे मद्य पार्सलद्वारे मुंबई व इतर शहरामध्ये पाठवले जात होते तसेच दुचाकीचा वापर करून पुणे शहरात त्याची विक्री केली जात होती. अशी माहिती अटक करण्यात आलेल्या महेशभाई कोळी याने पथकाला दिली. ही कामगिरी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय उपायुक्त विजय चिंचाळकर, अधीक्षक चरणसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली उप अधीक्षक संतोष जगदाळे, निरीक्षक आर. पी. शेवाळे, दुय्यम निरीक्षक एन. एन. मारकड, सहाय्यक दुय्यम निरीक्षक एस. एस. लोहकरे, एस. एस. इंदलकर, जवान व वाहनचालक जवान शरद भोर, गोपाल कानडे व महिला जवान उज्वला भाबड यांच्या पथकाने केली. दाखल गुन्ह्याचा तपास राज्य उत्पादन शुल्क, सी विभागाचे निरीक्षक राजाराम प्रभु शेवाळे करत आहेत.

## महाराष्ट्र थंडीचे वातावरण

**मुंबई । वृत्तसंस्था**

संक्रातीनंतरच्या आठवड्यात राज्यभरातील किमान तापमानाचा पारा सरासरी १५ अंशाच्या आसपास राहील, असा अंदाज हवामान अभ्यासकांनी वर्तविला आहे. त्यामुळे उद्यापासून सुरु होणा-या आठवड्यात थंडीत राज्यातला मुक्काम कायम राहणार असतानाच मुंबईकरांना मात्र बदलत्या हवामानामुळे उन्हाचे चटके बसत आहेत. मुंबईचे कमाल तापमान ३३ तर किमान तापमान २२ अंश नोंदविण्यात आले असून, हवामान बदलामुळे मुंबईकरांना गरम होत असल्याचे चित्र आहे. दक्षिण भारतातील हिवाळी पावसाचा हंगाम १५ जानेवारीला आटोपण्याची शक्यता आहे. तेथील मान्सून बाहेर पडला की महाराष्ट्रात थंडीसाठी पूरकता वाढते. उत्तर भारतात थंडीची तीव्रता कमी आहे. म्हणून महाराष्ट्रात कडाक्याच्या ऐवजी साधारण थंडी जाणवेल. थंडी संक्रांतीदरम्यान जाणवणार असली तरी १४ पर्यंत महाराष्ट्रात पहाटेचे किमान तापमान १८ म्हणजे सरासरीपेक्षा ४ ने अधिक तर दुपारचे कमाल तापमान ३० म्हणजे सरासरीइतके असु शकते, अशी माहिती हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.


## जाहिर प्रगटन

**मा.श्री.ओ.एन.मंत्री, सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दि.अर्ज क्र. ७३/२०२४**

**अर्जुन पि. किसन काकडे व ईतर विरूध्द निरंक**

**अर्जदार : १) अर्जुन पि. किसन काकडे, रा. जरूड, ता.जि.बीड, २) श्रीमती निलावती भ्र. आश्रुबा काकडे, रा. वरीलप्रमाणे, ३) मधुकर पि.आश्रुबा काकडे,रा. वरीलप्रमाणे, ह.मु. स्वराज्यनगर, बीड, ता.जि.बीड, ४) सुधाकर पि. आश्रुबा काकडे, रा. जरूड, ता.जि.बीड, ५) प्रभावती भ्र. आसाराम देवडकर, रा. रामगांव, पो. नाथापूर, ता.जि.बीड.**

**विरूध्द निरंक**

**गैरअर्जदार :- निरंक (नील)**

**मागणी : बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **किसन पि. भागुजी काकडे** यांचा मृत्यू झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत नामे किसन पि. भागुजी काकडे** यांचा दिनांक ०९/०७/१९८८ रोजी झाला आहे. यांचे मृत्यू वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

**मयत किसन पि.भागुजी काकडे** यांचे मृत्यूनंतर वरील अर्जदार यांना शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहून मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर ह्या जाहिर नाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत **किसन पि.भागुजी काकडे** वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०९/०१/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.**

**प्रकरणातील पुढील तारीख १६/०२/२०२४ आहे.**

**क.लि.**

**मार्फत अॅड. शेळके** | **कोर्टाचा शिक्का** | **आदेशावरून स्वाक्षरीत अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर**


## शिवसेना भरवणार नाशिकमध्ये प्रदर्शन

**नाशिक । वृत्तसंस्था**

बाबरी मशीद कोणी पाडली, यावरून भाजप आणि शिवसेनेच्या ठाकरे गटात जुंपली असताना आता कारसेवेचे खरे श्रेय ठाकरे गटाचेच आहे, हे दाखवण्यासाठी नाशिकमध्ये शिवसेना पुरावे सादर करणार आहे. यासंदर्भात एक प्रदर्शनच भरवण्यात येणार आहे. इतकेच नव्हे तर १९९२ मध्ये अयोध्येत जाऊन कार सेवा करणाऱ्या शिवसैनिकांचा सत्कार नाशिकमध्ये करण्यात येणार आहे. शिवसेनेचे महाशिबिर येत्या २२ आणि २३ जानेवारीला नाशिकमध्ये भरणार आहे. त्याची सध्या जय्यत तयारी सुरू आहे. सध्या अयोध्येत प्रभु श्री रामचंद्रांचे मंदिर बांधले जात असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्याचे लोकार्पण करण्यात येणार आहे. उद्धव ठाकरे यांना सुरुवातीला या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले नव्हते. नंतर ते देण्यात आले आहे. मात्र, ते नाशिकला २२ जानेवारीला श्री काळाराम मंदिरात दर्शन घेऊन महाआरती करणार आहेत. दरम्यान, वादग्रस्त बाबरी ढांचा कोणी पाडला, यावरून दावे- प्रतिदावे सुरू असून शिवसैनिकांनीच हे काम केल्याचा दावा करण्यात आला तर दुसरीकडे शिवसेनेचा त्याच्याशी संबंध नव्हता, असा प्रतिदावा भाजपकडून यापूर्वीच करण्यात आला आहे. त्यामुळे शिवसेनेने हे काम केले हे दाखवण्यासाठी शिवसेना ठाकरे गट नाशिकमध्ये प्रदर्शन भरवणार आहे. कारसेवेत सहभागी शिवसैनिकांची कामगिरी, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या वृत्तपत्रात प्रसिद्ध मुलाखती, कारसेवेची छायाचित्रे, कारागृहात शिक्षा भोगून बाहेर पडतानाची छायाचित्रे तसेच डिस्चार्ज कार्ड प्रदर्शनात मांडण्यात येणार आहेत.

## विश्व मराठी संमेलनावरून नाराजी

**नागपूर । वृत्तसंस्था**

मराठी भाषा विभागाच्यावतीने येत्या २७ ते २९ जानेवारीदरम्यान सिडको नवी मुंबई येथे विश्व मराठी संमेलनाचे आयोजन केले आहे. या संमेलनाच्या निमंत्रणावरून महाराष्ट्रातील साहित्यिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. विभागातर्फे परदेशातून येणाऱ्या पाहुण्यांना उपस्थित राहण्यासाठी संपूर्ण खर्च दिला असताना राज्यातील साहित्यिकांना कार्यक्रमांची व व्यवस्थेची माहिती न देता केवळ निमंत्रण पाठविल्याने स्व:खर्चाने केवळ श्रोते म्हणून टाळ्या वाजवायला उपस्थित राहावे काय, असा सवाल करण्यात येत आहे. महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडीचे संयोजक व अ.भा. मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी मिळालेल्या निमंत्रणावर तीव्र नाराजी व्यक्त करणारे पत्र राज्याचे मराठी भाषा मंत्री व मुख्यमंत्री यांना पाठविले आहे. मराठी भाषा विभागातर्फे त्यांना पवई येथे हाणाऱ्या विश्व मराठी संमेलनास उपस्थित राहण्यासाठी निमंत्रणाचा मेल पाठविला आहे. मात्र कोणत्या कार्यक्रमात यायचे, कशासाठी यायचे, याबाबत काहीही माहिती या मेलमध्ये नाही. महाराष्ट्रातील ज्येष्ठ लेखकांना अशा रीतीने निमंत्रणे देणे हा त्यांचा अवमान आणि अधिक्षेप असल्याचा आरोप डॉ. जोशी यांनी केला. अशाप्रकारचे पत्र इतर काही साहित्यिकांना आल्याचे त्यांनी सांगितले. याउलट परदेशातून येणाऱ्या लोकांना संमेलनात उपस्थित राहण्यासाठी आधीच ७५ हजार रुपये खर्च देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे परेदशातील किमान ५०० पाहुणे संमेलनात आणण्याचा प्रयत्न असल्याने यासाठी ३ कोटी ७५ लक्ष रुपये खर्च केले जाणार आहेत. म्हणजे परदेशातील लोकांना भारत फिरण्यासाठी कोटींची उधळण करून महाराष्ट्रातील साहित्यिकांशी भेदभाव करून अवमानकारक अशा वातावरणात हे संमेलन घेतले जात असल्याची टीका त्यांनी केली. गेल्या वर्षी देखील असाच प्रकार झाला होता व यावर्षी देखील या अपमानकारक स्थितीची पुनरावृत्ती केली जात असल्याचा आरोप डॉ. जोशी यांनी केला. संमेलनात उपस्थित राहण्यासाठी प्रवास, निवास, भोजन आदीसाठी किमान ४० हजार रुपये खर्च अपेक्षित आहे, तो आम्ही स्वतःच करायचा आहे काय? तसे असल्यास ते देखील स्पष्टपणे कळवायला हवे. मिळालेल्या मेलवर कुठलीच गोष्ट स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे कशासाठी नेमके यायचे आहे, कोणत्या कार्यकर्मात सहभाग नियोजित आहे, की केवळ टाळ्या वाजवायला आम्ही उपस्थित राहायचे? केवळ श्रोते म्हणून उपस्थिती नोंदवायला आम्ही यायचे असा याचा अर्थ होतो.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# कंटेनर पिकअपच्या भिषण अपघातात ४ जण ठार ; दोन्ही वाहन चालकांचा मृत्यू

**बीड । वृत्तसंस्था**

पिकअप व कंटेनरच्या भीषण अपघातातचार जण जागीच ठार झाल्याची घटना बीडतालुक्यातील ससेवाडी येथे शुक्रवारी रात्रीसाडेनऊ वाजेच्या सुमारास घडली. मृतांमध्येदोन्ही वाहनांच्या चालकांसह चौघांचा मृत्यूझाला. रात्री उशीरापर्यंत पोलिस - नागरिकांचे मदतकार्य सुरू होते. मद्य प्राशनकेल्यामुळे कंटनेर चालकाचा ताबा सुटून हाअपघात झाल्याचा पोलिसांचा प्राथमिकअंदाज आहे. मांजरसुंब्याहून पाटोद्याकडे जात असलेल्यापीकअपला (एम. एच. २३/ ५२३२)पाटोद्याहून मांजरसुंब्याकडे लोखंडी पाइपघेऊन जाणा-या कंटेनरने ससेवाडीगावाजवळ समोरून धडक दिली. याअपघातात कंटेनरमधील लोखंडी पाइपपिकअप वर पडल्याने पिकअपमध्येअसलेला चालक व प्रवासी दबून गेले. पिता-पूत्रही ठार: मृतांमध्ये प्रल्हादसीताराम घरत (वय ७०), नितीन प्रल्हादघरत (वय ३५ दोघे रा. महाजनवाडी) यांचासमावेश आहे. हे दोघे पिता-पूत्र असून तेदोघे मांजरसुंबा येथून महाजन वाडीलाजाण्यासाठी पिकअपमध्ये बसले होते.पिकअप चालक विनोद लक्ष्मण सानप (४०,रा. वाघीरा) यांचाही मृत्यू झाला आहे. तर,मृत कंटेनर चालकाचे नाव गहिनीनाथबाबूराव गर्जे रा. डोईठाण (कापसे) ता.आष्टी जि. बीड असे आहे. शेतकरी प्रल्हाद सीताराम घरत यांचा धाकटामुलगा बालाजी घरत याच्या अपघाती मृत्यूच्याक्लेमची तारीख शुक्रवारी संभाजीनगर येथे होती.त्यामुळे प्रल्हाद घरत आणि नितीन घरत हे दोघेबापलेक संभाजीनगरला आले होते.संभाजीनगरचे क्लेमचे काम आटोपून ते बीडतालुक्यातील मांजरसुंबा येथे आले. रात्रीसव्वाआठ वाजता वाधिरा येथील पिकअपमध्येबसून ते अहमदपूर-नगर मार्गावरून महाजनवाडीगावाकडे निघाले होते. तेव्हाच ससेवाडीजवळअपघातात त्यांचा मृत्यू झाला. बीड तालुक्यातील महाजनवाडीयेथील प्रल्हाद सीताराम घरत हेशेतकरी. त्यांना दहा एकर शेती.शेतीवरच त्यांच्या कुटुंबाचीगुजराण चालत होती. त्यांच्यासहमोठा मुलगा नितीन घरत (४१)याचाही शुक्रवारच्या अपघातातमृत्यू झाल्याने कुटुंब उघड्यावरपडले आहे. सध्या घरात कर्तामाणूस राहिलेला नाही. बीड तालुक्यातीलमहाजनवाडी येथील प्रल्हादसीताराम घरत (६३) यांचाधाकटा मुलगा बालाजी प्रल्हादघरत याचा २०१५ मध्ये बीड तालुक्यातील आहेरवडगाव फाटा येथे बसच्या धडकेतदुचाकीवर असताना मृत्यूझाला होता. त्यामुळे कुटुंबावरसंकट कोसळले होते.

## घरपट्टी, पाणीपट्टी दरवाढीचे प्रस्ताव सादर करा -महानगर पालिका

**नगर । वृत्तसंस्था**

नागरिकांचा रोष टाळण्यासाठी आजवरच्या सत्ताधाऱ्यांनी थांबवलेले कर व दर वाढीचे प्रस्ताव महापालिका प्रशासकांच्या कार्यकाळात मार्गी लागण्याची शक्यता आहे. मालमत्ता कर, पाणीपट्टीसह इतर कर, विविध विभागांकडून विविध परवानग्या, कामांसाठी आकारले जाणारे दर वाढवण्याबाबत विभाग प्रमुखांकडून प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. येत्या तीन दिवसात हे प्रस्ताव सादर करावेत, असे आदेश प्रशासक तथा आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी काढले आहेत. गेल्या १८ वर्षांपासून महापालिकेच्या मालमत्ता करात वाढ झालेली नाही. पाणीपट्टीमध्ये वाढ करण्याचे प्रस्ताव पाणी प्रश्नाचे कारण देऊन सातत्याने फेटाळण्यात आले आहेत. शासन आदेशानुसार अग्निशमन कराची अंमलबजावणीही गेल्या चार वर्षांपासून रखडलेली आहे. घनकचरा व्यवस्थापन शुल्क वाढीचा प्रस्तावही सात वर्षांपासून लालफितीत अडकलेला आहे. गाळा भाडे आकारणी व कराराचे नुतनीकरण राजकीय हस्तक्षेपामुळे रखडलेले आहे. परिणामी, महापालिकेचे उत्पन्नाचे स्रोत आटले आहेत. खर्च मात्र दिवसेंदिवस वाढत असल्याने महापालिकेच्या आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. प्रशासक राजमुळे स्थायी समिती व सर्वसाधारण सभेचे अधिकार अटवायुक्तांकडे आहेत. त्यामुळे या कर व दर वाढीच्या रखडलेल्या प्रस्तावांना गती मिळण्याची शक्यता आहे. आयुक्त जावळे यांनी याबाबत सर्व विभाग प्रमुखांना आढावा घेऊन आवश्यकतेनुसार कर व दर वाढीचे प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत. विशेष म्हणजे, प्रस्तावांना विलंब झाल्यास शिस्तभंग कारवाई करण्याचा इशाराही आयुक्तांनी दिला आहे.

## मराठा आरक्षणासाठी आत्महत्यांचे सत्र थांबेना ; मराठवाड्यात दोघांनी संपवलं जीवन

**लातूर । वृत्तसंस्था**

मराठा आरक्षणासाठी मागील काही दिवसांत मराठवाड्यात होणाऱ्या आत्महत्यांचे सत्र दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. आत्महत्या करू नका असे अवाहन मनोज जरांगे यांच्याकडून सतत करण्यात येत आहे. मात्र, असे असतांना देखील आत्महत्या सुरूच आहे. गेल्या दोन दिवसांत पुन्हा एकदा मराठवाड्यात दोघांनी मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केली आहे. परभणी जिल्ह्यातील ३४ वर्षीय आणि लातूरमधील २१ वर्षीय तरुणाने मराठा आरक्षणासाठी टोकाचे पाऊल उचलत जीवन संपवलं आहे. सचिन शिंदे (वय ३४ वर्ष, सनपुरी लातूर), मते (वय २१ वर्ष, रा.लोणी शहाजहानपूर, ता. जि. बीड) असे आत्महत्या केलेल्या तरुणांची नावं आहेत. मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरू असतानाच कुठल्याही तरुणांनी टोकाचे पाऊल उचलू नाही, असं प्रशासन, मनोज जरांगे यांच्याकडून सांगण्यात येत आहे. मात्र, तरीही तरुण आत्महत्याकडे वळत आहेत. परभणीच्या सनपुरी गावात ३४ वर्षीय सचिन शिंदे याने मराठा आरक्षणासाठी आपले जीवन संपवले आहे. 'मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याने मी स्वतःला संपवत आहे', अशा आशयाची चिठ्ठी लिहून सचिनने शेतात गळफास घेत आत्महत्या केली आहे. या घटनेने जिल्हाभरात हळहळ व्यक्त केली जात असून, संपूर्ण सनपुरी गावावर शोककळा पसरली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी लातूर जिल्ह्यातील आयुर्वेदिक महाविद्यालयात बीएएमएसचे शिक्षण घेत असलेल्या प्रदीप मते या विद्यार्थ्याने आत्महत्या केली आहे. 'मराठा आरक्षण' अशी चिठ्ठी लिहून व मोबाईलवर स्टेटस ठेवत गळफास लावून या तरुणाने जीवन संपवलं. शुक्रवारी (१२ डिसेंबर) रोजी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास एका खाजगी वसतिगृहात ही घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांत आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मते एका खाजगी आयुवेर्दिक महाविद्यालयात बीएएमएसच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत होता. तो सध्या खाजगी वसतिगृहात राहत होता. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, अशी त्याची सुरुवातीपासूनच धारणा होती. मराठा आरक्षणासाठी त्याने शुक्रवारी राहत असलेल्या खोलीतील पंख्याला सुताच्या दोरीने गळफास लावून आत्महत्या केली. मृत्यूपूर्वी मयत प्रदीप मते याने एका चिठ्ठीत 'मराठा आरक्षण-१२-१-२०२४' व मोबाईलच्या स्टेटसला 'मराठा आरक्षण' असे लिहून आपली जीवनयात्रा संपविली. याप्रकरणी लातूरच्या शिवाजी नगर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## इंडिया आघाडीचे खरगेंकडे नेतृत्वपदाची जबाबदारी

**पुणे । वृत्तसंस्था**

इंडिया आघाडीचे नेतृत्व मल्लिकार्जुन खरगे यांनी स्विकारावं अशी सूचना काही सहकार्यांनी केली, त्याला अनेकांनी संमती देखील दिली. त्याचप्रमाणे संयोजक म्हणून नितीश कुमारांनी जबाबदारी घ्यावी अशी सूचना करण्यात आली होती. परंतु संयोजक पदाची गरज नसल्याचं मत नितीश कुमारांनी मांडलं. त्यामुळे संयोजक पदाची नियुक्ती करण्यात आली नाही, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारांनी दिली. एकविचाराने निवडणुकीला सामोरे जाण्याचा विचार असल्याचं शरद पवारांनी या बैठकीनंतर प्रतिक्रिया दिली. इंडिया आघाडीच्या बैठकीचं ऑनलाइन माध्यमातून आयोजन करण्यात आलं होतं. या बैठकीमध्ये शरद पवार, ममता बॅनर्जी, सोनिया गांधी, राहुल गांधी यांनी देखील हजेरी लावली. अवघ्या काही महिन्यांत लोकसभेच्या निवडणुकांचं बिगुल वाजणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीची ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जागावाटपाच्या संदर्भात ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. परंतु या बैठकीत जागावाटपासंदर्भात काही निर्णय झाला नसल्याचं शरद पवारांनी म्हटलं. जागावाटपाच्या संदर्भात काही वाद आहते, ते मिटवले जावे याबाबत या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती शरद पवारांनी दिली. पुढे त्यांनी म्हटलं की, एकत्रित सभा घेण्यासाठी एक कमिटी स्थापन व्हावी अशा सूचना देखील अनेकांनी मांडल्या. देशाला पर्याय देण्यासाठी विविध राजकीय पक्ष सत्ताधा-यांच्या विरोध एकत्र येत आहेत. हिच इंडिया आघाडी जमेची बाजू आहे. इंडिया आघाडीमधून पंतप्रधान पदाचा चेहरा कोण असणार यावर राजकीय वर्तुळात चर्चा सुरु आहेत. यावर शरद पवारांनी म्हटलं की, कुणाचं तरी नाव प्रोजेक्ट करुन त्याच्या नावे मतं मागावी अशी गरज वाटत नाही. आम्हाला विश्वास आहे की, आम्ही देशाला पर्याय देऊ शकतो. मोरारजी देसाई यांचे उदाहरण देत इंडिया आघाडीत सध्या तरी पंतप्रधान पदाचा चेहरा नसावा. अयोध्येतील श्रीरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणार आहे, मला त्याचं आमंत्रण आलेलं नाही. मी म्हटलं काही हरक्त नाही, पण मी जाणार. मात्र २२ जानेवारीला नाही जाणार, नंतर नक्की जाणार, श्रीराम हे सर्वांचे आहेत, असं शरद पवार म्हणाले आहेत.

## अवैधरीत्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई

**जालना । वृत्तसंस्था**

अवैध धारदार तीन तलवारी बाळगणाऱ्या दोन जणांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केली आहे. सादत खान हसन खान (फुकटनगर, जालना), हैदर शहा नवाब शहा (इंदिरानगर, जालना) अशी तलवारी बाळगणाऱ्यांची नावे आहेत. अवैधरीत्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्यांवर पोलिसांकडून कारवाया केल्या जात आहेत. या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाया सुरू केल्या आहेत. दोघेजण तलवारी बाळगून असल्याची माहिती पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक शैलेश बलकवडे, एएसपी आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली पीआय रामेश्वर खनाळ, आशिष खांडेकर, राजेंद्र वाघ, विनायक कोकणे, गोपाल गोशिक, सॅम्युअल कांबळे, रामप्रसाद पव्हरे, सचिन चौधरी, प्रशांत लोखंडे, लक्ष्मीकांत आडेप, सचिन आर्य, सतीश श्रीवास, देविदास भोजने, भागवत खरात आदींनी केली आहे.

# राज्यात घोटाळ्यांवर घोटाळे! महायुती सरकारचा आता ८ हजार कोटींचा महाघोटाळा -विजय वडेट्टीवार

**मुंबई । वृत्तसंस्था**

महायुती सरकारमध्ये अनेक घोटाळे समोर येत असून, महायुती सरकारचा ८ हजार कोटीचा आणखी एक महाघोटाळा पुढे आला असल्याचा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. केवळ सात दिवसांच्या शॉर्ट नोटीसवर टेंडर काढून रुग्णवाहिका खरेदीचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. ४ हजार कोटीमध्ये जे काम होवू शकत होते, त्या कामासाठी ८ हजार कोटीचा खर्च करण्यामागचं कारण काय? असा प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे. याबाबत ट्विट वडेट्टीवार यांनी म्हटले आहे की, मंत्रिमंडळ बैठकीत २ जुलै रोजी टेंडर काढण्याचा निर्णय झाला. ४ ऑगस्ट २०२३ रोजी टेंडर काढण्याचा अध्यादेश निघाला. पहिले टेंडर सप्टेंबर २०२३ ला निघाले आणि त्याची मुदत २१ दिवस होती. पुढे हे टेंडर रद्द करण्यात आले. पहिल्याच टेंडरवर दुसरे टेंडर ४ जानेवारी २०२४ निघाले आणि त्याची मुदत ७ दिवस होती. तर, याबाबत प्री-बिड मीटिंग घेतलेली नाही, असे वडेट्टीवार म्हणाले. राज्यात घोटाळ्यावर घोटाळे पुढे येत आहे. मर्जीतील माणसांना कोट्यावधीची काम देण्यासाठी, वाटेल ती शक्कल लढवली जात आहे. भ्रष्टाचाराचा कळस गाठण्याचा काम या सरकारमध्ये सुरू आहे. काल केवळ सात दिवसाच्या शॉर्ट



नोटीसवर १०८ रुग्णवाहिकांचा आठ हजार कोटीचा टेंडर काढण्यात आला. फक्त सात दिवसात हा टेंडर काढला गेला. रुग्णवाहिकेचा कोणताही टेंडर तीन वर्षांपेक्षा जास्त नसतो, मात्र हे टेंडर १० वर्षांसाठी काढण्यात आला आहे. कसल्याही पद्धतीने याची चौकशी केल्यावर हे टेंडर फक्त ४ हजार कोटींचं आहे. मात्र, आरोग्य विभागाच्या मंत्र्यासह आयएएस अधिकाऱ्याला बदलीचा धाक देऊन केवळ सात दिवसांची मुदत देऊन, आठ हजार कोटींचा टेंडर मर्जीतील माणसासाठी काढण्यात आला. यातून चार हजार कोटींची कमाई होणार असल्याने हा टेंडर काढला गेला. यातून जनतेच्या पैशांची लूट केली जात असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे. कर्ज काढल्याने तिजोरीत पैसे नसल्याने हे राज्य आधीच बरबाद झालं आहे. अशा परिस्थितीत रुग्णवाहिकेचा ८ हजार कोटीचा महाघोटाळा करण्यात आला आहे. आरोग्य खातचं भ्रष्टाचारामध्ये बुडाला आहे. कुठल्याही अभ्यासाकाला बसवा माझा दावा आहे हे काम ४ हजार कोटीचे आहे. ४ हजार कोटीच्या कामासाठी ८ हजार कोटी मोजण्यात आले. मंत्र्याच्या जवळच्या नातेवाईकाने हे काम मिळवून मंत्र्याची पार्टनरशिप यामध्ये आहे. हे राज्य उध्वस्त करण्याचं काम सुरू आहे. राज्याची तिजोरी लुटली जात आहे. घोटाळेबाज सरकारने राज्याला अधोगतीकडे नेण्याचं काम सुरू केले आहेत, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे.

## ग्रामपंचायत निधीचा अपहार करणं अंगलट ; दोन सरपंचांच्या मालमत्तेवर टाच

**नाशिक । वृत्तसंस्था**

ग्रामपंचायत निधीचा अपहार केल्याप्रकरणी सरपंचाच्या मालमत्तेवर टाच आणण्यात आली आहे. मालेगाव पंचायत समितीने ही कारवाई केली आहे. ग्रामसेवकाच्या वेतनातूनही वसुली करण्यात येत आहे. माहिती अधिकारी कार्यकर्त्याने तीन वर्षांचा पाठपुरावा केल्यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीमध्ये काम न करता शासन निधीचा अपहार केल्याप्रकरणी नाशिकच्या मालेगाव तालुक्यातील खडकी येथील तत्कालीन दोघा सरपंचांच्या मालमत्तेवर बोजा चढविण्यात आला तर ग्रामसेवकांची वेतनातून अपहरणाची रक्कम वसूल करण्याची कारवाई पंचायत समितीने केली आहे. या कारवाईचा गाव कारभारी असलेल्या सरपंच व ग्रामसेवकांनी चांगलाच धसका घेतला आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते यांनी तीन वर्ष केलेल्या पाठपुराव्यामुळे ही कारवाई करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. मालेगाव तालुक्यातील खडकी या गावाच्या विकासासाठी ग्रामपंचायतीला विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून सुमारे ८० लाख रुपये निधी प्राप्त झाला होता. वेगवेगळ्या चार खात्यांवर ही रक्कम वर्ग करण्यात आली होती. मात्र हा निधी खर्च न करता परस्पर काढून घेण्यात आल्याने माहिती अधिकारी कार्यकर्ते यांनी त्याविरुद्ध लढा उभारला.

## गेवराईत गर्भलिंग निदानाचा प्लॅन

**बीड । वृत्तसंस्था**

गेवराईतील गर्भलिंग निदानाच्या प्रकरणात आणखी एक माहिती समोर आली आहे. बीड तालुक्यातून जून २०२१च्या गर्भपाताच्या गुन्ह्यातील तारीख बीडच्या न्यायालयात २ जानेवारी रोजी होती. यात जालन्याचा आणि गेवराईची बडतर्फ अंगणवाडी सेविका यांची भेट झाली. याचवेळी त्याने एक साधा मोबाईल घेऊन दिला. त्यात दुसऱ्याच्या नावाचे सीमकार्ड टाकले. याच ठिकाणी त्यांनी पुन्हा एकदा गर्भलिंग निदान करण्याचा बाजार सुरू करण्याचा प्लॅन आखल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. गेवराई शहरातील संजयनगर भागात ५ जानेवारी रोजी पोलिस व आरोग्य विभागाने संयुक्त मोहीम राबवून अवैध गर्भलिंग निदान प्रकरणाचा पर्दाफाश केला होता. या प्रकरणात मनीषा सानप, घर मालक आणि जालन्याचा यांच्याविरोधात गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. यातील हा घटनास्थळावरून फरार झाला होता तर व पोलिसांच्या ताब्यात आहेत. त्यांची गुरुवारी सहा दिवसांची पोलिस कोठडी संपत असून, त्यांना पुन्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे. ज्या ठिकाणी गर्भलिंग निदान तपासणी झाली होती, त्याच ठिकाणाहून पोर्टेबल सोनोग्राफी मशीन जप्त करण्यात आली होती. ही मशीन तपासणी करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांना पोलिसांनी पत्र दिले आहे. यांनीही रेडिओलॉजिस्टसह तिघांची समिती मशीन तपासणीसाठी नियुक्त केली आहे. त्यानंतर पोलिसांना अहवाल दिला जाणार आहे. गर्भलिंग निदानानंतर मुलगी असल्यास लगेच गर्भपात करण्याचीही तयारी आरोपींची होती. त्यादृष्टीने घटनास्थळी साहित्य व गर्भपाताच्या गोळ्या, औषधी सापडल्या होत्या. या गोळ्यांची तपासणी करून याने गर्भपात होऊ शकतो, असा अहवाल औषध प्रशासनाने दिला आहे. तर या औषधी कोठून आल्या? याचा शोध सुरू असल्याचे पत्र 'एफडीए'ने पोलिसांना दिले आहे.आणि गवारे यांची २ जानेवारी रोजी बीडच्या न्यायालयात भेट झाली होती. याचठिकाणी गवारे याने दुसऱ्याच्या नावावरील सीमकार्ड असलेला मोबाइल मनीषाला दिला होता. तो मोबाइल सध्याही गवारे याच्याकडेच आहे. तो फरार असून, दोन पथके शोध घेत आहेत. तर अटकेतील मनीषा व चंदनशिव यांची पोलिस कोठडी संपत असून, गुरुवारी त्यांना पुन्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे. तसेच सोनोग्राफी मशीन तपासणीसाठी आरोग्य विभागाला पत्र दिले आहे.

## १५ दिवसांत मराठी पाट्या लावा ; दुकानदारांना महापालिकेच्या प्रशासकांच्या सुचना


**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

शहरातील दुकाने, मॉल व इतर आस्थापनांवर इंग्रजी व इतर भाषांतील पाट्यांप्रमाणे मराठी पाट्यादेखील तेवढ्याच मोठ्या आकारात लावाव्यात यासाठी मनपाने १५ दिवसांची मुदत दिली आहे. त्यानंतर मराठी पाट्या नसलेल्या दुकानांना सील करण्यात येईल, असा इशारा महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिला आहे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार शहरातील सर्व व्यापाऱ्यांना त्यांच्या दुकानांबाहेर मराठी फलक लावणे बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शहरातील सर्वच आस्थापनांच्या पाट्या किंवा फलक हे मराठी भाषेमध्ये लावण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. त्यानुसार मनपाकडून कारवाई करण्यात येत आहे. कायदेशीर दुकाने अथवा आस्थापनांना मनपाने नोटीस दिली आहे. आतापर्यंत एकदा प्रत्यक्ष व दुसऱ्यांदा वर्तमानपत्राद्वारे जाहीर आवाहन करून सर्वांना फलक मराठी भाषेत लावण्यासंदर्भात सूचना करण्यात आली. काही दुकानदारांनी फलक बदलले. मात्र बहुतांश दुकानांवर पूर्वीचेच फलक आहेत. या व्यापाऱ्यांना आता शेवटची संधी देण्यात येणार आहे. व्यापार किंवा कुठलेही दुकान सुरू करताना संबंधित मालकांनी त्याची नोंद मनपाकडे करणे आवश्यक आहे. ही नोंद आहे की नाही याचीही पाहणी करण्यात येणार आहे. त्याचबरोबर व्यापाऱ्यांनी आपला व्यवसाय कायमस्वरूपी असो वा तात्पुरता असो, मराठीत फलक लावणे त्यांच्यावर बंधनकारक असल्याचे प्रशासक श्रीकांत यांनी स्पष्ट केले.

# पत्रकारांचे प्रश्न न सोडवणाऱ्या राज्य सरकारच्या विरोधात आमचा लढा -देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदेची कोणतीही राजकीय भूमिका नाही. जे सरकार पत्रकारांचे प्रश्न सोडवतील, आह्मी त्या सरकारच्या सोबत आहे. पण जे सरकार पत्रकारांचे प्रश्न सोडवणार नाही, आम्ही त्यांच्या विरोधात लढत राहू. मग ते सरकार कोणत्याही पक्षाचे असले तरी आह्मी लढा सुरूच ठेवू,' असे प्रतिपादन मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केले. मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात येणारा वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ आणि रंगा अण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा व पत्रकार मेळावा शनिवारी, (१३ जानेवारी २०२४) नांदेड जिल्ह्यातील श्री क्षेत्र माहूरगड येथे उत्साहात पार पडला. यावेळी देशमुख बोलत होते. याप्रसंगी आमदार भीमराव केराम, स्वागताध्यक्ष रामदास सुमठाणकर, माहूर नगर पंचायत नगराध्यक्ष फिरोज दोसानी, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख, नांदेड भाजप जिल्हाध्यक्ष सुधाकर भोयर, जिल्हा परिषद नांदेड माजी उपाध्यक्ष समाधान जाधव, शिवसेना विधानसभा क्षेत्रप्रमुख ज्योतिबा खराटे, माहूर नगर परिषद माजी नगराध्यक्ष समरजी त्रिपाठी,



मराठी पत्रकार परिषद विश्वस्त किरण नाईक, परिषदेचे अध्यक्ष शरद पाबळे, कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सरचिटणीस मन्सूरभाई शेख, कोषाध्यक्ष विजय जोशी, टीव्ही असोसिएशनचे अध्यक्ष विनोद जगदाळे, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, मराठी पत्रकार परिषद राज्य प्रसिद्धीप्रमुख संदीप कुलकर्णी, डिझिटल मीडिया राज्याध्यक्ष अनिल वाघमारे, लातूर विभाग विभागीय संघटक प्रकाश कांबळे, नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघ गोवर्धन बियाणी, जिल्हा कार्याध्यक्ष संतोष पांडागळे, माहूर तालुका मराठी पत्रकार संघ तालुकाध्यक्ष सरफराज दोसानी यांच्यासह राज्यभरातून आलेले पदाधिकारी, पत्रकार, मराठी पत्रकार परिषदेचे सदस्य उपस्थित होते. देशमुख यांनी पुढे बोलताना सांगितले की, 'सरकार कुठल्याही असले तरी पत्रकारांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन नकारात्मक असाच आहे. सरकारच्या पेन्शन योजनेबाबत नेहमी हे दिसून येते. पत्रकारांना पेन्शन देताना सरकार त्यांच्याकडे बजेट नसल्याचे नेहमीच सांगते. त्यामुळे आता पत्रकारांच्या पेन्शनसाठी सरकारने अर्थसंकल्पातच तरतूद करावी, अशी मागणी आम्ही राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. तसेच पत्रकार संरक्षण कायदा झाला, पण तो कागदोपत्री आहे. प्रत्यक्षात पत्रकार संरक्षण कायदा अंमलात आलेला नाही. कारण या कायद्याचे नोटिफिकेशनच अद्याप निघाले नाही. ही सरकारने एक प्रकारे पत्रकारांची केलेली फसवणूकच आहे. पत्रकार संरक्षण कायद्यासाठी वेळप्रसंगी न्यायालयात जाऊ,' असे सांगतानाच देशमुख पुढे म्हणाले,' पत्रकारांनी समाज, सरकार तुमच्यासोबत येईल, ही अपेक्षा ठेवण्यापेक्षा पत्रकारांनीच पत्रकारांसाठी आता काहीतरी करण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण पत्रकारावर हल्ला झाला तर पत्रकार वगळता कोणी निवेदन सुद्धा देण्यासाठी पुढे येत नाही. हे आपण वारंवार पाहतो. त्यामुळे आता मराठी पत्रकार परिषद पत्रकारांना मदत करता यावी, यासाठी कायद्याच्या चौकटीत राहून एक कोटी रुपयांचा फंड उभारण्यासाठी काम करत आहे. या फंडामधून दरवर्षी किमान २५ पत्रकारांना मदत करता आली तरीही ते खूप मोठे काम होईल.' आमदार भीमराव केराम मेळाव्याला राज्यभरातून आलेल्या पत्रकारांचे स्वागत केले, व ते म्हणाले,' मराठी पत्रकार परिषद राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहे. लेखणीच्या माध्यमातून आमच्या सारख्या राजकीय नेत्यांनी केलेली कामे पत्रकार लोकांसमोर आणतात. तसेच वेळप्रसंगी लेखणीतून आम्हाला आमच्या चुका दाखवून देण्याचे कामही पत्रकार करतात. खरंतर एखाद्या राजकीय नेत्याची ओळख ही पत्रकारांच्या लेखणीच्या माध्यमातूनच होत असते,' असे सांगत आमदार केराम यांनी पत्रकारांच्या कामाचा गौरव केला. तसेच परिषदेचे मुख्य विश्वस्त यांच्या संघर्षाचे कौतुक केले.

# तलवाडा पोलिस स्टेशनच्या हद्दीत अवैध वाळू उपसा व वाहतूक सुरुच!

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलिस स्टेशनच्या हाद्दीत सातत्याने अवैधरित्या केणीव्दारे वाळु उपसा व वाहतूक सुरु आसल्याचे बोलले जात आसतांना हे काम गेवराई महसुलच्या आधिपत्यखाली आसल्याचे सांगत स्थानीय पोलिस मात्र विविध अवैध धंद्याचे हाप्ते जमवन्यातच दंग दिसुन येत आसल्याची तलवाडा परिसरात चर्चा होत असतांनाच गेवराई तहसीलचे महसुलचे पथक आज दिनांक १३/१/२०२४ रोजी सकाळी महसूल



पथक गेवराई हे अवैध वाळू उत्खनन व वाहतूक बाबत गस्त घालत असताना एक वाळूने भरलेले ट्रॅक्टर पकडले. ट्रॅक्टर चालक यांना वाळू वाहतूक बाबत परवाना विचारला असता परवाना नसल्या बाबत सांगितले. सदरील कर्यवांही श्री. संजय सोनवणे नायब तहसिलदार गेवराई. मंडल अधिकारी बाबा बडे , तलाठी निखिल तपसे. बालाजी सोंनर कोतवाल कुंदन काळे. गजानन शिंगणे यांनी केली. सदरील ट्रॅक्टर पुढील कार्यवाहीसाठी तहसिल कार्यालय गेवराई येथे लावले आसल्याचे मंडळ अधिकारी बाबा बडे यांनी आमच्या प्रतिनिधिस सांगितले आहे.

# मारहाण प्रकरणातील वादग्रस्त पोलीस निरीक्षक कदम यांची अखेर बदली

**परळी । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते तथा इंजेगावचे माजी उपसरपंच मुक्ताराम गवळी यांना फिर्यादी सोबत पोलीस स्टेशनमध्ये गेले असताना ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हेमंत कदम यांनी शिवीगाळ करून मारहाण केली होती. या प्रकरणी त्यांच्यावर कारवाई करावी या मागणीसाठी मुक्ताराम गवळी यांनी उपोषण केले होते तर बौद्धजन संघर्ष समितीने आंदोलन केले होते. या आंदोलनास यश आले असून जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी कदम इंजेगाव चे माजी उपसरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते मुक्ताराम गवळी हे एका प्रकरणात फिर्यादी सोबत तक्रार दाखल करण्यासाठी गेले असताना परळी ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हेमंत कदम यांनी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून मारहाण केले होती. याप्रकरणी कदम यांच्यावर कारवाई करावी या मागणीसाठी बौद्धजन संघर्ष समितीच्या वतीने विभागीय पोलीस महासंचालक औरंगाबाद, जिल्हा पोलीस अधीक्षक बीड, अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, उपजिल्हाधिकारी परळी तसेच तहसीलदार परळी यांना निवेदने देऊन कारवाई करण्याची मागणी केली होती. तसेच २० डिसेंबर रोजी मुक्ताराम गवळी यांनी शहर पोलीस स्टेशन समोर पाच दिवस अमरण उपोषण केले होते. त्यानंतर २६ डिसेंबर रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी या प्रकरणाचा तपास अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे सोपविला होता. तसेच कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. दरम्यान २७ डिसेंबर रोजी बौद्ध जन संघर्ष समितीच्या वतीने परळी बंदचे आवाहनही केले होते. परंतु जिल्हा पोलीस अधिक्षकांच्या लेखी आश्वासनानंतर मुक्ताराम गवळी यांनी आपले उपोषण मागे घेतले. तसेच बौद्ध जन संघर्ष समितीने बंद हे मागे घेतला होता. दरम्यान हेमंत कदम यांच्या बदलीमुळे बौद्ध जन संघर्ष समितीच्या आंदोलनाला यश मिळाले आहे. यापुढेही मुक्ताराम गवळी यांना न्याय मिळवून देण्यासाठी समिती लढा सुरू ठेवणार असल्याचे म्हटले आहे.

# राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रमाता जिजाऊ' यांची जयंती आज साजरी करण्यात आली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात व 'राष्ट्रमाता जिजाऊ' यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, नायब तहसिलदार श्री. टाक, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजदीप बनसोड यांच्यासह उपस्थित अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही प्रतिमेस पूष्प अर्पण करुन अभिवादन केले. स्वामी विवेकानंद यांची जयंती राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरी करण्यात येते. शहरातील विविध शासकीय, निमशासकीय शाळा महाविद्यालयात 'स्वामी विवेकानंद' व 'राजमाता जिजाऊ' जयंती निमित्त अभिवादनासह विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.






# जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचे शिवसेनेत प्रवेश - सचिन मुळूक

**बीड । प्रतिनिधी**

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेत असताना निष्ठावंत शिवसैनिकांची व पदाधिकाऱ्यांची सत्तेत असतानाही हेळसांड झाली, त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. परंतु मी स्व. बाळासाहेब, स्व.आनंद दिघे यांच्या शिवसैनिकांना वाऱ्यावर सोडणार नाही. बीड जिल्ह्यातील सर्व शिवसैनिकांची जबाबदारी शिवसेनेचा मुख्य नेता म्हणून मी घेतली आहे, असे आश्वासन



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. परळी, अंबाजोगाई, केज, माजलगाव तालुक्यातून शिवसेनेत इनकमिंग सुरूच आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा. श्रीकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथील वर्षा निवासस्थानी शुक्रवारी (दि.१२) ठाकरे गटाच्या तालुकाप्रमुख, शहरप्रमुखांसह इतर ८३ प्रमुख पदाधिकाऱ्यांन सह हजारो शिवसैनिकांनी जाहीर प्रवेश केला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे बोलत होते. शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात शिवसेनेची संघटनशक्ती वाढत आहे. त्यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला सुरुंग लावला आहे. शिवसैनिक, पदाधिकाऱ्यांना बळ देण्याचे काम आपण करणार आहे, असे श्री. शिंदे म्हणाले. यावेळी परळीचे ठाकरे गटाचे माजी तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे, माजी शहरप्रमुख गजानन मुडेगावकर, माऊली गोंडे, बनसारोळा सरपंच यांनी जाहीर प्रवेश केला.

# राष्ट्रमाता जिजाऊ जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये स्वराज्य जननी, राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त कार्यक्रम आनंद मागासवर्गीय आणि प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे अध्यक्ष बी.एस. धुतालमल आणि मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांची प्रभातफेरी शालेय परिसरातून काढण्यात आली. या प्रसंगी संतोष मेश्राम, यु.बी.पवळ आणि मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बी.एस.धुतालमल यांनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांनी मानवतेच्या समृध्दीसाठी अंतिम क्षणापर्यंत कार्य केले असे विचार अध्यक्षीय समारोपात करतांना प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे संचलन श्रीमती एन.जी.मुंडे, प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यु.एस. वाघमारे यांनी केले. या प्रसंगी आनंद छात्रालयाचे अधिक्षक डी.व्ही.खरसाडे, यशवंत वसतिगृहाचे अधिक्षक उत्तम टाळके, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी डी.जी.हजारे, सुभाष गायकवाड, एल.बी.हजारे, भारत कोळेकर यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय संमेलनास शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील आशिर्वाद मंगल कार्यालयात रविवार दि.१४ जानेवारीस होणार्या



शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि सहयोगी पक्षांच्या जिल्हास्तरीय संमेलनास शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकार्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांनी केले आहे. भाजप, शिवसेना(शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात समन्वय असावा, यासाठी महायुती मित्रपक्ष संमेलन आयोजित करण्यात येत आहे. लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने तीनही मित्रपक्षांत समन्वय राहावा, जिल्ह्यांत कार्यक्रमांची अंमलबजावणी सर्वदूर व्हावी, हा मित्रपक्ष संमेलनाचा उद्देश आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने मित्रपक्ष संमेलनाचे जिल्हा समन्वय प्रमुख म्हणून माजी आमदार अमरसिंह पंडित यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मित्रपक्ष संमेलन होत आहे. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भाजप, शिवसेना व सहयोगी पक्षांचे जिल्हाप्रमुख, खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी, प्रमुख पदाधिकार्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. शहरातील आशीर्वाद कार्यालयात रविवारी (दि.१४) होणार्या जिल्हास्तरीय संमेलनास शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकार्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांनी केले आहे.



बीड : राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना ॲड.गोविंद शिराळे, अनंता गुंदेकर यांच्यासह आदी.

# रोटरी क्लब सेंट्रल आयोजित शिबीराचा लाभ घ्या

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथे दिनांक १० जानेवारी ते १५ जानेवारी पर्यंत मानपाठ कंबर व गुडघेदुखी आजारावर भव्य रोग निदान व निसर्गोपचार आरोग्य शिबीर चालू असून रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल व आयकॉन ट्रस्ट यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक १० जानेवारी ते १५ जानेवारी २०२४ पर्यंत गुडघे दुखी कंबर दुखी पाठ व मानदुखी तसेच हाडाचे व स्नायूच्या आजारावर तज्ञांकडून अक्युप्रेशर व निसर्गोपचार तंत्राने उपचार करण्यात येत असून यात कुठेही औषधी गोळ्यांचा वापर करण्यात येत नाही.माजलगाव शहरातील चांदणी ग्राउंड परिसरात पाच दिवस चालणाऱ्या या आरोग्य शिबीराचा गरजू व्यक्तींनी लाभ घ्यावा असे आवाहन रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलचे अध्यक्ष यांनी शिबिराचे उद्घाटन प्रसंगी केले आहे. माजलगाव येथील लाईफ लाईन हॉस्पिटल चांदणी ग्राउंड येथे पाच दिवसाचे रोग निदान व निसर्गोपचार शिबीर आयोजित केले आहे.

# बीड जिल्ह्यातील कुणबी नोंदी शोधण्यासाठी खा.रजनीताई पाटील मदत करणार -देशमुख

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील अनेक गावांमध्ये मराठा कुणबी नोंदी सापडतील. कारण, मागील ३ दिवसांत प्रशासनाने केलेल्या सहकार्यामुळे, मोडी लिपी अभ्यासकाच्या मदतीने व देशमुख आणि परळी तालुक्यातील सकल मराठा समाज बांधवांच्या पुढाकाराने परळीत ६१६ कुणबी नोंदी सापडल्या आहेत. बीड जिल्ह्यातील मराठा बांधवांच्या उर्वरित कुणबी नोंदी शोधण्यासाठी खा.रजनीताई पाटील यांच्या मध्यस्थीने लवकरच तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांची हैद्राबाद येथे शिष्टमंडळासह जाऊन भेट घेणार आहोत अशी माहिती देशमुख यांनी दिली आहे. परळी तालुक्यात मराठा कुणबी समाज मोठ्या संख्येने असूनही नोंदी सापडत नाहीत. त्या शोधण्यासंदर्भात राजेसाहेब देशमुख यांच्याकडे अनेक सकल मराठा कुणबी समाज बांधवांनी संपर्क साधून विनंती केल्यावर देशमुख यांनी पुढाकार घेत वैभव जगताप (नाशिक) या मोडी लिपी अभ्यासकांच्या मदतीने परळीतील भूमी अभिलेख कार्यालयात ९, १० व ११ जानेवारी २०२४ रोजी स्वतः वेळ देवून, सकल मराठा समाज बांधवांसह हजर राहून प्रशासनाचे सहकार्य घेवून तब्बल ६१६ कुणबी नोंदी शोधून काढल्या आहेत. मनोजदादा जरांगे पाटील यांच्या सक्षम नेतृत्वात राज्यासह बीड जिल्ह्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या अनुषंगाने सर्वस्तरांतून कुणबीच्या नोंदी शोधण्याची मोहीम सुरू आहे. परळीत मोडी लिपी तज्ज्ञ उपलब्ध नसल्याने नोंदी शोधणे हे मोठे आव्हान वाटत होते. अखेर गुरूवारी तीन दिवसांच्या परिश्रमाने कुणबीच्या ६१६ नोंदी सापडल्या. नोंद सापडल्यामुळे परळी तालुक्यातील सकल मराठा समाजात आनंदाला उधाण आले आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीशी



बोलताना भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी सांगितले की, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाच्या कुणबी नोंदी मोठ्या प्रमाणात सापडत असताना बीड जिल्ह्यामध्ये मात्र या कुणबी नोंदी शोधण्याचे काम प्रशासनाकडून म्हणावे तेवढ्या गतीने होताना दिसून येत नाही. बीड जिल्ह्यात मराठा कुणबी समाज मोठ्या संख्येने राहत आहे. असे असताना ही मराठा कुणबी नोंद का सापडत नाही. म्हणून याबाबत आम्ही माहिती घेतली असता मोडी लिपी भाषा जाणणारे तज्ज्ञ याकामी आवश्यक आहेत. म्हणून मी वैभव जगताप (नाशिक) या मोडी लिपी अभ्यासकांच्या मदतीने परळीतील भूमी अभिलेख कार्यालयात ९, १० व ११ जानेवारी २०२४ रोजी सकल मराठा समाज बांधवांसोबत हजर होतो. प्रशासनाचे सहकार्य घेवून परळी तालुक्यातील पाडूळी – ४९, हिवरा – ६४, पिंपरी (बु.) – ७६, तेलसमुख – ४४, डाबी – ०२, तळेगाव – ०१, बेलंबा– ०९, कौठळी – ३३, टाकळी देशमुख – १२, कौडगाव घोडा – ८०, कौडगाव साबळा – ३३, बोरखेड – ५३, कौडगाव हुडा – ५५, गोवर्धन – ३८, जयगाव – २३, इंजेगाव – ११, ममदापूर – ३३ अशा एकूण तब्बल ६१६ कुणबी नोंदी शोधून काढण्यात आम्हाला यश आले. सन १८८० साली तत्कालीन निजाम सरकारने मराठवाड्यात केलेल्या तपशीलवार जनगणनेचे सर्व रेकॉर्ड हे हैद्राबाद येथील सालारजंग म्युझियम मध्ये सुरक्षित जतन करून ठेवलेले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील मराठा बांधवांच्या उर्वरित कुणबी नोंदी शोधण्यासाठी खा.रजनीताई पाटील यांच्या मध्यस्थीने लवकरच तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांची हैद्राबाद येथे शिष्टमंडळासह जाऊन भेट घेणार आहोत. अशी माहिती देशमुख यांनी दिली आहे.